ग्रामीण कृषी मौसम सेवा
भारत मौसम विभाग
केंद्रीय कापूस संशोधन संस्था
नागपूर

हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 05-11-2026

नागपूर(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2026-11-05 (पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

हवामान घटक	2026-11-06	2026-11-07	2026-11-08	2026-11-09	2026-11-10
पर्जन्यमान (मिमी)	0.0	0.0	0.0	0.0	0.0
कमाल तापमान (अं.से)	32.8	32.1	32.4	32.4	31.2
किमान तापमान (अं.से)	19.7	18.2	19.2	18.1	17.2
सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के)	64	52	56	56	63
दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के)	33	21	21	22	25
वाऱ्याचा वेग(किमी/तास)	7	8	7	6	5
वाऱ्याची दिशा(अंश)	32	25	21	23	27
मेघाच्छादन (ऑक्टा)	2	1	0	0	0
चेतावणी	चेतावणी नाही	चेतावणी नाही	चेतावणी नाही	चेतावणी नाही	चेतावणी नाही

भविष्यवाणी सारांश:

• नागपुर जिल्ह्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या जिल्हास्तरीय अंदाजानुसार, पुढील ५ दिवसा दरम्यान आकाश निरभ्र ते आंशिक ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक ०३ ते ०७ नोव्हेंबर २०२६ रोजी हवामान कोरडे राहण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे. • विदर्भामध्ये पुढील ७ दिवस कमाल तापमानात मोठा बदल होणार नाही आणि पुढील ४ दिवस किमान तापमानात सुमारे २°सेल्सिअस ने घट होईल, त्यानंतर किमान तापमानात मोठा बदल होणार नाही.

हवामान चेतावणी (पुढील दिवशी 08:30 IST पर्यंत वैध):

• ईशारा नाही.

हवामान चेतावण्यांचे कृषीवरील संभाव्य प्रभाव आणि संबंधित एग्रोमेट सल्ले:

• ईशारा नाही.

कृषि सल्ला:

• कोरड्या हवामानाचा अंदाज लक्षात घेता, कापणी केलेल्या सोयाबीन ची मळणी, परिपक्व अवस्थेतील धान पिकाची कापणी व मळणीची कामे सुरु ठेवावी. • सिंचनाच्या उपलब्धतेनुसार कापूस, तूर व इत्यादी पिकास संवेदनशील अवस्थेत असताना ओलीत करावे. • कीड व रोग नियंत्रणासाठी, कीटकनाशके हाताळताना आणि फवारताना सुरक्षा उपायांचे पालन करावे आणि संरक्षक साधनांचा वापर करावा. शिफारस केलेला विशिष्ट डोस वापरावा आणि वापरासाठी दिलेल्या सूचनांचे पालन करावे. वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने फवारणी करू नये. कीटकनाशक हाताळताना आणि फवारणी करताना खाऊ, पिऊ, धूम्रपान करू किंवा चघळू नये. तसेच डोळे, नाक, तोंड, कान आणि हातांचे संरक्षण करावे. हातमोजे, फेस मास्क वापरावा आणि अनवाणी पायांचे संरक्षण करावे. फवारणीनंतर हात आणि कीटकनाशकाच्या संपर्कात आलेले शरीराचे इतर भाग साबण आणि पाण्याने धुवावेत.

संक्षिप्त संदेश सल्ला:

• सिंचनाच्या उपलब्धतेनुसार कापूस, तूर व इत्यादी पिकास संवेदनशील अवस्थेत असताना ओलीत करावे.

पिक निहाय सल्ला:

पिक	पिक निहाय सल्ला
हर भरा	• हरभरा पिकाचे पेरणी करिता देशी वाण आणि बियाणे दर- हिरवा चाफा (एकेजीएस- १), विजय आणि आयसिसिव्ही- १० (५०-६० किलो बियाणे प्रती हेक्टर), पिकेव्ही हरिता (एकेजी- ९३०३- १२) आणि जाकी ९२१८ (७५- ८५ किलो बियाणे प्रती हेक्टर बियाणे), काबुली वाण आणि बियाणे दर पिकेव्ही काबुली- २ आणि पिकेव्ही काबुली- ४ (११०- ११५ किलो बियाणे प्रती हेक्टर), गुलाबी हरभरा वाण गुलक- १ (७५-८५ बियाणे प्रती हेक्टर) या प्रमाणात १५ ऑक्टोबर ते १५- ३० नोव्हेंबर पर्यंत पेरणी करावी. पिकेव्ही कांचन (एकेजी- १९०९) या वाणाची ५०-६० किलो बियाणे प्रती हेक्टर या प्रमाणात १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर पर्यंत करावी. • हरभरा बियाण्यास पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास ५ ग्राम ट्रायकोडर्मा किंवा २ ग्राम थायरम + २ ग्राम कार्बेन्डाझिम बीजप्रक्रिया, यानंतर २५० ग्राम रायझोबियम (नत्र स्थिरीकरण करणारे जिवाणू) आणि २५० ग्राम पी. एस. बी. (स्फुरद विरघळविणारे जिवाणू) प्रती १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणात मिसळून बीज प्रक्रिया करावी. बीज प्रक्रिया केल्यानंतर तासभर सावलीत सुकवावे आणि मग पेरणी करावी.
गहू	• गहू पिकासाठी मध्यम भारी, खोल व पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. गहू पिकासाठी जमीन तयार करताना १५ ते २० सेंमी खोल नांगरणी करावी. वखराच्या २ ते ३ पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. पूर्वीच्या पिकाची धसकटे, काडी कचरा वेचून शेत स्वच्छ करावे. गहू लागवड शक्यतो समपातळीत असावे जेणेकरून पुढील ओलीत व्यवस्थापन करता येईल आवश्यकता भासल्यास जमीन समपातळीत आणण्यासाठी पाटा मारावा. कोरडवाहू गहू पिकाची पेरणी ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात करावी. कोरडवाहू गहू पेरणीस प्रती हेक्टरी ७५ किलो बियाणे वापरावे. कोरडवाहू गव्हाची पेरणी जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असतानाच करावी आणि पेरलेले बियाणे ओलाव्यात पडेल याची पुरेशी दक्षता घ्यावी. कोरडवाहू वेळेवर पेरणीसाठी दोन ओळीमध्ये २३ सेंमी अंतर ठेवावे. गहू पेरणी वेळी ५ ते ६ सेंमी पेक्षा खोल पडणार नाही याची काळजी घ्यावी. • कोरडवाहू गहू पेरणीकरिता एकेडीडब्लू २९९७- १६ (शरद), पिडीकेव्ही वाशीम (डब्लूएसएम- १४७२), एमएसीएस १९६७ आणि एनआय ५४३९. पिडीकेव्ही वाशीम (डब्लूएसएम- १४७२) या वाणाची मर्यादित ओलीत उपलब्ध परिस्थितीमध्ये निवड करावी. बागायती गहू वेळेवर पेरणीसाठी एकेडीडब्लू १०७१ (पूर्णा), एकेडीडब्लू ३७२२ (विमल), एचडी २१८९ आणि एचडी २३८० या वाणाची निवड करावी. बागायती गहू उशिरा पेरणीसाठी पिडीकेव्ही सरदार (एकेएडब्लू ४२१०-६), एकेएडब्लू ४६२७, एकेएडब्लू-३८१, एकेएडब्लू १०७१ (पूर्णा) आणि एचआय ९७७ या वाणाची निवड करावी. गहू बियाण्यास पेरणीपूर्वी थायरम किंवा विटावॅक्स ७५ टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी २.५ ग्राम प्रती किलो त्याचबरोबर ॲझोटोबॅक्टर हे नत्र स्थिरीकरण करणारे जीवाणू संवर्धन आणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू खत प्रत्येकी २५० ग्राम प्रती १० ते १२ किलो बियाण्यास लावून बीजप्रक्रिया करावी.
तूर	• सिंचनाच्या उपलब्धतेनुसार तूर पिकास संवेदनशील अवस्थेत ओलीत करावे. • खरीप तूर पिकामध्ये मर/करपा रोगाची लक्षणे दिसून आल्यास, नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात कॉपर ऑक्सीक्लोराईड ५०% डब्ल्यूपी @ २५ ग्रॅम किंवा कॅप्टन ७५% डब्ल्यूपी @ २० ग्रॅम मिसळून आळवणी करावी. • तुरीमध्ये दिसून येणाऱ्या

पिक	पिक निहाय सल्ला
	फायटोफ्थोरा करपा (खोड कुज किंवा खोड करपा) रोगाच्या नियंत्रणासाठी, १० लिटर पाण्यात फोसेटाइल एएल ८०% डब्ल्यूपी @ २० ग्रॅम मिसळून फवारणी करावी.
भात	• पाणी व्यवस्थापन:- • २) धान पिकात पीक निसवण्यापूर्वी १० दिवस व पीक निसवल्यानंतर १० दिवस पाण्याची पातळी १० सें.मी. (चार इंच) ठेवावी. पीक फुलोरा अवस्थेत असताना पाण्याचा ताण पडू देऊ नये. • रोग व्यवस्थापन:- • १) करपा व मानमोडी :- हेक्झाकोनॅझोल ५ % ई.सी. @ २० मि.ली. किंवा मेंकोझेब ७५% प्रवाही @ ३० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • २) कडाकरपा:- कॉपर हायड्रॉक्साईड ५३.८ % डी एफ @ ३० ग्रॅम किंवा स्ट्रेप्टोमायसीन सल्फेट ९०% + टेट्रासायक्लीन हायड्रोक्लोराइड १०% एसपी @ १.५ ग्रॅम हे संयुक्त जीवाणू नाशक प्रती १० लिटर पाण्यात मिसळून लावणीनंतर १० दिवसाच्या अंतराने दोन ते तीन फवारण्या कराव्यात. • ३) भातावरील आभासमय काजळी (False smut): फ्लुओपायरम १७.७% w/w + टेबुकोनॅझोल १७.७% w/w SC @ ५५० ग्रॅम प्रति हेक्टर किंवा पिकोक्सीस्ट्रोबिन ७.०५% + प्रोपिकोनॅझोल ११.७% SC @ १.० लिटर प्रति हेक्टर किंवा थिफ्लुझामाइड १५% + डिफेनोकोनॅझोल २०% SC @ २५० मिली प्रति हेक्टर किंवा अझोक्सीस्ट्रोबिन ४.७% + मँकोझेब ५९.७% + टेबुकोनॅझोल ५.६% WG @ २.० किलो प्रति हेक्टर • किड व रोग व्यवस्थापन:- • १) खोडकिडीच्या व्यवस्थापनासाठी • Ø पिकाची वरचेवर पाहणी करून किडग्रस्त फुटवे मुळासकट काढून नष्ट करावी हे काम हंगामात किमान ३-४ वेळा करावे. • Ø हेक्टरी २० या प्रमाणे कामगंध सापळे लावावे. ट्रायकोग्रामा जापोनिकम (ट्रायकोकार्ड) हे परोपजीवी किटक हेक्टरी ५०,००० अंडी या प्रमाणात दर ७ दिवसाच्या अंतराने ३ ते ४ वेळा सोडावे. • Ø बुरशीजन्य किटकनाशके जसे मेटारायझीयम, बिव्हेरिया @४० ग्राम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात वापर करावा. • Ø शेतात ५ टक्के किड ग्रस्त फुटवे दिसताच अॅझाडीरेक्टीन ०.१५ टक्के @३० ते ५० मि.ली. किंवा क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही @२६ मि.ली. किंवा कार्बोसल्फान २५ टक्के @१६ मि.ली. किंवा क्लोरॅनट्रानीलीप्रोल १८.५ % एस.सी. @ ३ मिली. प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी किंवा कर्बोफ्युरॉन ३ टक्के दाणेदार @२५ कि./हे. किंवा फिप्रोनील ०.३ टक्के दाणेदार @१६.६७ कि. /हे. याप्रमाणे बांधीमध्ये टाकावे. किंवा शेतात १० % किडग्रस्त फुटवे दिसताच क्लोरॅनट्रानीलीप्रोल ०.४ % दाणेदार @ १० कि. ग्रॅ. किंवा कारटॅप हायड्रोक्लोराईड ४ जी @ १८ कि.ग्रॅ. किंवा फीप्रोनिल ०.३ जी @ २५ कि.ग्रॅ. प्रती हेक्टर बांधीमध्ये पाणी असतांना टाकावे. • Ø रासायनिक किटकनाशक वापरतांना सुरक्षेची सर्व काळजी घेऊनच वापर करावा • २) गादमाशी:- कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार @ २५ किलो ग्रॅम प्रती हेक्टरी बांधीमध्ये ७ ते १० सेमी. पाणी, असतांना वापरावे. बांधीमधील पाणी ४ ते ५ दिवस बांधीबाहेर काढू नये. • ३) तुडतुडे :- धान पिकावर तुडतुडे यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे तरी त्यांच्या नियंत्रणासाठी मेटारायझियम अनिसोप्ली या जैविक बुरशीचा १.१५ % @ २.५ कि.ग्रॅ. प्रती हेक्टर या प्रमाणात बांधीमध्ये वापर करावा. तुडतुड्यांची आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडताच नियंत्रणासाठी बुप्रोफेजीन २५ % प्रवाही @१६ मि.ली. किंवा इमिडाक्लोप्रीड १७.८ एस. एल. @२.० मि.ली. किंवा फिप्रोनिल ५ एस.सी. @ २० मि.ली. किंवा इथोफेनप्रॉक्स १० % प्रवाही @१० मि.ली. किंवा फ्लोनीकॅमीड ५० डब्लु.जी. @ ३.० ग्रॅम किंवा थायमिथॉगझाम २५ डब्लु.जी. @ २.० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • ४) धान पिकावरील तपकिरी तुडतुड्यांच्या प्रभावी आणि किफायतशीर व्यवस्थापनाकरिता किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी (फुटव्याच्या वेळी दहा तुडतुडे किंवा लोंबीच्या पुढील अवस्थेत पाच ते दहा तुडतुडे प्रती चूड) गाठताच फ्लोनीकॅमीड ५० डब्लु.जी. @ ३.० ग्रॅम प्रति दहा लिटर पाण्यात मिसळून पहिली फवारणी व त्यानंतर पंधरा दिवसांनी पायमेट्रोजिन ५० डब्लु.जी. या रासायनिक कीटकनाशकाची ६ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून दुसरी फवारणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.
कपाशी	• रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी, आर्थिक उंबरठा पातळीनुसार ॲसिटामिप्रिड २० एसपी १५ ग्रॅम प्रति हेक्टर किंवा फ्लोनिकमाइड ५०% @ ३ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. • गुलाबी बोंडअळीवर देखरेख ठेवण्यासाठी, शेतात प्रति एकर २ फेरोमोन सापळे लावा. कीड प्रादुर्भावासाठी कापूस शेताचे प्रतिनिधित्व म्हणून प्रति एकर २० झाडांचे निरीक्षण करा. जर आकस्मिक आढळून आली, तर लक्षणे दिसू लागल्यापासून एका आठवड्याच्या अंतराने, कॉपर ऑक्सीक्लोराईड ५०% डब्ल्यूपी @ २५० ग्रॅम किंवा कार्बेंडाझिम ५०% डब्ल्यूपी @ १०० ग्रॅम आणि युरिया २ किलो प्रति १०० लिटर पाण्याच्या द्रावणाचे २-३ वेळा आळवणी करावी. • कपाशीतील मावा, तुडतुडे आणि फुलकिडे यांसारख्या रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी, तसेच कपाशीच्या पात्यांवर गुलाबी बोंडअळीच्या माद्यांना अंडी घालण्यापासून अटकाव घालण्यासाठी, निंबोळी अर्क ५ % + कडुलिंबाचे तेल ५ मिली/लिटर किंवा निंबोळी तेलावर आधारित मिश्रण (३०० किंवा १५०० पीपीएम) ५ मिली/लिटर + १.० ग्रॅम धुण्याचा सोडा मिसळून फवारणी करावी. • कपाशीमध्ये दीर्घकाळ पावसाचा खंड असल्यास ०२ किलो १३:००:४५ या विद्राव्य खताची २०० लिटर पाण्यात मिसळून

पिक	पिक निहाय सल्ला
	प्रति एकर या प्रमाणात फवारणी करावी. त्यानंतर ४ ते ५ दिवसाच्या अंतराने कपाशीमध्ये नैसर्गिक पाते व फुलगळ होत असल्यास ती टाळण्यासाठी एनएए म्हणजेच नॅफ्थॅलीन ऍसिटिक ऍसिड ०४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • ज्या शेतकरी बांधवांनी कपाशीची लागवड अति घनता लागवड पद्धत (३ बाय १/२ फूट) किंवा कमी अंतर लागवड पद्धतीद्वारे (३ बाय १ फूट) या पद्धतीने केली असल्यास व ४० ते ४५ दिवसाचे असल्यास पाते लागण्याच्या अवस्थेत पिक वाढ रोधक मेपिक्वेट क्लोराईड ५% एएस १ मिली/लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी आणि दुसरी फवारणी १५-२० दिवसांनी १.० मिली/लिटर पाण्यात मिसळून करावी. पावसाचा दीर्घ काळ खंड असल्यास मेपिक्वेट क्लोराईड ची फवारणी टाळावी. • कपाशीमध्ये तुडतुडे व पांढरी माशीच्या निगराणीसाठी व नियंत्रणासाठी एकरी ०८ प्रमाणे पिवळे चिकट सापळे लावावेत. नत्रयुक्त खतांचा अतिरेक टाळावा. तुडतुड्यांनी आर्थिक नुकसानीचा स्तर ओलांडल्यास फ्लोनिकामिड ५० डब्ल्यूजी ४ ग्राम किंवा डीनोटेफुरोन २० एसजी ०३ ग्राम प्रती लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.

फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

फळे आणि भाजीपाला पिक	फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला
टोमॅटो	• टोमॅटोच्या पिकावरील लवकर येणारा करपा या रोगाच्या व्यवस्थापनासाठी रोपे लावण्याच्या एक किंवा दोन दिवस आधी कॉपर ऑक्सीक्लोराईड (३.० ग्रॅम/लिटर) किंवा कॉपर हायड्रॉक्साईड (२.० ग्रॅम/लिटर) फवारणी करावी. पिकाच्या मुख्य शेतात १०-१५ दिवसांच्या अंतराने किंवा आवश्यकतेनुसार कॉपर ऑक्सीक्लोराईड (३.० ग्रॅम/लिटर) किंवा मॅनकोझेब (२.० ग्रॅम/लिटर) किंवा क्लोरोथॅलोनिल (२.० ग्रॅम/लिटर) किंवा प्रोपिनेब (२.० ग्रॅम/लिटर) किंवा मेटिराम (२.० ग्रॅम/लिटर) किंवा पायराक्लोस्ट्रोबिन + मेटिराम (२.० ग्रॅम/लिटर) किंवा टेबुकोनाझोल ५०% + ट्रायफ्लॉक्सिस्ट्रोबिन २५% (०.६ मिली/लिटर) पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. • टोमॅटोच्या पिकावरील उशिरा येणारा करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी मँकोझेब (२.० ग्रॅम/लिटर) किंवा कॉपर ऑक्सीक्लोराईड (३.० ग्रॅम/लिटर) किंवा बोर्डो मिश्रण (१%) किंवा कॉपर हायड्रॉक्साईड (२.० ग्रॅम/लिटर) किंवा फोसेटाइल-अल (२.० ग्रॅम/लिटर) किंवा डायमेथोमॉर्फ (२.० ग्रॅम/लिटर) किंवा पायराक्लोस्ट्रोबिन + मेटिराम (२.० ग्रॅम/लिटर) यांचे मिश्रण किंवा मेफेनोक्साम + कॉपर हायड्रॉक्साईड (२.० ग्रॅम/लिटर) किंवा मेटालेक्झिल ८% + मँकोझेब ६४% (२.० ग्रॅम/लिटर) पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. • टोमॅटोच्या पिकामध्ये भुरी रोगाची सुरुवात झाल्यास हेक्साकोनाझोल (१ मिली/लिटर) किंवा डायनोकॅप (१ मिली/लिटर) किंवा पाण्यात विरघळणारे सल्फर (२.५ ग्रॅम/लिटर) किंवा कार्बेंडाझिम (१.० ग्रॅम/लिटर) किंवा ट्रायडाइमेफॉन २५ डब्ल्यूपी (०.४ ग्रॅम/लिटर) किंवा डायफेनकोनाझोल (०.५ मिली/लिटर) किंवा क्रेसोक्सिम मिथाइल ४४.३% एससी (२.० मिली/लिटर) किंवा प्रोपिकोनाझोल २५ ईसी (१.० मिली/लिटर) पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी.
मिरची	• तापमानातील चढ उतार व उच्च आद्रतेमुळे मिरची पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी हेक्साकोनाझोल ७५ % डब्ल्यूजी ६६.७ ग्राम ग्रॅम किंवा टेब्युकोनाझोल २५ % डब्ल्यूजी @ ५००-७५० ग्रॅम किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन ८.३ % + मॅन्कोझेब ६६.७ % डब्ल्यूजी @ १५०० ग्रॅम किंवा बोस्कालीड २५.२ % + पायराक्लोस्ट्रोबिन १२.८ % डब्ल्यूजी @ ६०० ग्राम किंवा कार्बेन्डाझिम १२ % + मॅन्कोझेब ६३ % डब्ल्यूजी @ ७५० ग्रॅम किंवा क्रेसॉक्सिम - मिथाइल १५ % + क्लोरोथॅलोनिल ५६ % डब्ल्यूजी @ १००० ग्रॅम किंवा टेबुकोनाझोल १० % डब्ल्यूपी + सल्फर ६५ % डब्ल्यूजी @ १२५० ग्रॅम किंवा टेबुकोनाझोल ५० % + ट्रायफ्लॉक्सिस्ट्रोबिन २५ % डब्ल्यूजी @ २५० ग्राम प्रती हेक्टर ५०० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून या पैकी कोणत्याही एका बुरशी नाशकाची स्वच्छ हवामन परिस्थिती असताना फवारणी करावी.
वांगे	• मागील आठवड्यातील उच्च आर्द्रता आणि ढगाळ हवामानामुळे, वांग्याच्या पिकावर फळे व शेंडा पोखरणाऱ्या अळीचा रादुर्भाव दिसून आल्यास व आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास कार्बोसल्फान २५ % ईसी १२५० मिली प्रति हेक्टर किंवा डेल्टामेथ्रिन ०२.८० % ईसी ४०० ते ५०० मिली प्रति हेक्टर किंवा इमामेक्टिन बेंझोएट ०५ % एसजी २०० ग्रॅम प्रति हेक्टर किंवा लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन

फळे आणि भाजीपाला पिक	फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला
	०४.९० % सीएस ३०० मिली प्रति हेक्टर किंवा स्पिनोसॅड ४५ % एससी १६२ ते १८७ मिली प्रति हेक्टर किंवा थियाक्लोप्रिड २१.७० % एससी ७५० मिली प्रति हेक्टर किंवा क्लोराँट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.६० % झेडसी २०० मिली प्रति हेक्टर या प्रमाणात ५०० लिटर पाण्यात मिसळून कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी.
संत्रा	• नोव्हेंबर महिन्यात मृग बहारातील (जून महिन्यात फुलोरा आलेली) नागपूर संत्रा व मोसंबीच्या झाडांना ठिबक सिंचन किंवा दुहेरी आळे पद्धतीने पाणी द्यावे. झाडांच्या वयानुसार दररोज प्रतिझाड पाण्याची मात्रा १ वर्ष वयाच्या झाडासाठी ८ लिटर, ४ वर्ष वयाच्या झाडासाठी ३६ लिटर, ८ वर्ष वयाच्या झाडासाठी ८५ लिटर आणि १० ते २५ वर्ष वयाच्या झाडासाठी १०५ लिटर ठेवावी. कागदी लिंबाच्या १ वर्ष वयाच्या झाडास दररोज ४ लिटर, तर १० वर्षे व त्यापेक्षा अधिक वयाच्या झाडास दररोज ८८ लिटर पाणी द्यावे. आंबिया बहारातील फळांची काढणी वेळेवर करावी. फळांच्या काढणीस विलंब होण्याची शक्यता असल्यास जिबरेलिक ॲसिड (GA_3) १५ पीपीएम + युरिया १% यांची दोन फवारण्या १५ दिवसांच्या अंतराने कराव्यात. बागेतील सर्व तण उपटून नष्ट करावीत तसेच झाडांच्या आळ्यातील माती हलकी खुरपून भुसभुशीत करावी. एक वर्ष वयाच्या प्रत्येक झाडास १०८ ग्रॅम युरिया आणि ४५ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश (MOP) द्यावे. दोन वर्षांच्या झाडांना दुप्पट, तीन वर्षांच्या झाडांना तिप्पट आणि चार वर्षे व त्यापुढील वयाच्या झाडांना चौपट मात्रा द्यावी. खतांचा वापर करताना जमिनीत पुरेसा ओलावा राहील याची काळजी घ्यावी, जेणेकरून खतांचे नुकसान टाळता येईल. फळधारणा झालेल्या बागांमध्ये प्रत्येक झाडाच्या विस्तारलेल्या फांद्यांच्या परिघात युरिया ५०० ग्रॅम, सिंगल सुपर फॉस्फेट (SSP) ६०० ग्रॅम, म्युरेट ऑफ पोटॅश (MOP) १५० ग्रॅम, फेरस सल्फेट १०० ग्रॅम, मँगनीज सल्फेट १०० ग्रॅम, झिंक सल्फेट १०० ग्रॅम आणि बोरॅक्स ५० ग्रॅम द्यावे. आंबिया बहार घेण्यासाठी झाडांना पाण्याचा ताण देण्याकरिता सिंचन बंद करावे. फळांची काढणी झाल्यानंतर झाडांवरील वाळलेल्या फांद्या व अनावश्यक पाणफुटीच्या फांद्यांची छाटणी करावी. त्यानंतर कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात बुरशीनाशकाची फवारणी करावी. मावा किडीचा प्रादुर्भाव आढळल्यास डायमेथोएट १.५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड ०.५ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी यापूर्वी वापरलेले नसलेले दुसरे कीटकनाशक वापरून फवारणी करावी. सिट्रस माइट (कोळी) किडीचा प्रादुर्भाव आढळल्यास डायकोफॉल २ मिली, प्रोपरगाइट १ मिली, इथिऑन २ मिली किंवा पाण्यात मिसळणारे गंधक ३ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी वरीलपैकी दुसऱ्या योग्य कीटकनाशकाची फवारणी करावी. यापूर्वी झाडांच्या खोडावर बोर्डो पेस्ट लावली नसल्यास ती लावावी. बोर्डो पेस्ट तयार करण्यासाठी १ किलो मोरचूद (कॉपर सल्फेट) ५ लिटर पाण्यात प्लास्टिकच्या बादलीत आणि १ किलो चुना ५ लिटर पाण्यात वेगळ्या बादलीत रात्रभर भिजत ठेवावा. दुसऱ्या दिवशी सकाळी दोन्ही द्रावणे तिसऱ्या बादलीत एकत्र करून चांगले ढवळावे. तयार केलेली पेस्ट मिश्रणानंतर १२ तासांच्या आत वापरावी. दुसऱ्या दिवशी उरलेली पेस्ट वापरू नये. फायटोप्थोरा/डिंक्या रोगाच्या नियंत्रणासाठी झाडाच्या खोडावरून डिंकासारखा चिकट द्रव बाहेर येत असलेला बाधित भाग धारदार चाकूने खरवडून स्वच्छ करावा आणि त्या ठिकाणी मेफेनॉक्सम + MZ किंवा फॉसेटिल-अल (Fosetyl-Al) यांची पेस्ट लावावी.
सिताफळ	• सीताफळाची फळे काळी पडू नयेत म्हणून मॅन्कोझेब २.० ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात फवारणी करावी तसेच पिठ्या ढेकणांच्या नियंत्रणासाठी बुप्रोफेझिन २५ एससी १.२५ मिली प्रति लिटर या प्रमाणात फवारणी करावी.

पशुधन विषयक निहाय सल्ला:

पशुधन विषयक	पशुधन विषयक निहाय सल्ला
गाय	• आवश्यकतेनुसार जनावरांच्या गोठ्यांच्या छतांची दुरुस्ती करा. • जनावरांच्या गोठ्याची जमीन स्वच्छ आणि कोरडी ठेवावी. • जनावरांच्या गोठ्याचा परिसर स्वच्छ आणि आरोग्यदायी ठेवा आणि

पशुधन विषयक	पशुधन विषयक निहाय सल्ला
	गोठ्याजवळील अनावश्यक वनस्पती काढून टाका.

हवामान चेतावण्यांचे संभाव्य प्रभाव (सामान्य):

ईशारा नाही.

परिणाम आधारित सल्ला (सामान्य):

ईशारा नाही.

Farmers are advised to download Unified ﷺMausamﷺ and "Meghdoot" android application on mobile for Weather forecast and weather based Agromet Advisories and "Damini" android application for forecast of Thunderstorm and lightening.

Mausam MobileApp link: https://play.google.com/store/apps/details/

Meghdoot MobileApp link: https://play.google.com/store/apps/details

Damini MobileApp link : https://play.google.com/store/apps/details